महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा. क्र. तंशिविकापु/विवि/२०२०-२१/ 3273

दिनांक :- 02 AUG 2021

प्रति,
प्राचार्य/संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखाली असलेल्या,
सर्व पदविका व पदवी ,पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविणा-या संस्था

विषय :-भारत निवडणूक आयोगाने पुरस्कत केलेल्या मतदारांचे पदध्दतशीर शिक्षण आणि निवडणुक सहभाग कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व महाविलयांमध्ये निवडणूक साक्षरता मंडळाची स्थापना करण्याबाबत..

संदर्भ :- महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन परिपत्रक क्र संकीर्ण-२०२१ प्र.क्र.१५३/विशि-३ दिनांक २३ जुलै,२०२१

उपरोक्त विषयास अनुसरुन या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संस्थांच्या संस्थाप्रमुखांना या परिपत्राकाव्दारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे दिनांक २३ जुले, २०२१ रोजीचे परिपत्रकान्वये निवडणूक साक्षरता मंडळाची स्थापना करण्याविषयी सुचित केले आहे,त्याची एक प्रत सोबत जोडण्यात येत आहे त्याचे अवलोकन करण्यात यावे व त्यामध्ये दिलेल्या सूचनाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

"मतदारांचे पद्वतशीर शिक्षण आणि निवडणूक सहभाग **"Systematic Voter Education and Electoral Participation (SVEEP)"** या कार्यक्रमांतर्गत महाविदयालयांमधील विदयार्थ्यांना निवडणूक प्रक्रियेबद्दल माहिती व्हावी, त्यांच्यामध्ये मतदार म्हणून नावनोंदणी करण्याविषयी मतदान करण्याविषयी तसेच लोकशाहीविषयी जागरुकता आणावी, या उद्देशाने राज्यातील महाविदयालयांमध्ये **दिनांक १५/०८/२०२१ पर्यंत** त्यांच्या महाविदयालयात निवडणूक साक्षरता मंडळाची स्थापना करावी. तसेच **दिनांक ३१ ऑगस्ट २०२१ पर्यंत** निवडणूक साक्षरता मंडळाचा नोडल अधिकारी असणा-या शिक्षकांचे आणि विदयार्थी प्रमुखांचे संपर्क क्रमांक (भ्रमणध्वनी क्रमांक आणि मेल आयडी)मुख्य निवडणूक अधिकारी,महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाला आणि परिशिष्ठ-१ मध्ये देण्यात आलेल्या आपल्या जिल्हा कार्यालयाच्या मेल आयडीवर कळविण्यात यावेत

तरी या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखाली असलेल्या संस्था प्रमूखाना सुचित करण्यात येते की संदर्भिय शासन परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे व दिलेल्या निर्देशानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

सोबत :- महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन परिपत्रक

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी

१. मा. कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे,विदयापीठ पुणे
२. मा. कुलगुरु पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विदयापीठ,सोलापूर
३. मा. कुलगुरु, शिवाजी विदयापीठ, कोल्हापूर,
४. मा. कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विदयापीठ लोणेरे, जि.रायगड

भारत निवडणूक आयोगाने पुरस्कृत केलेल्या "मतदारांचे पद्धतशीर शिक्षण आणि निवडणूक सहभाग (SVEEP)" कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये निवडणूक साक्षरता मंडळाची स्थापना करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र. १५३/विशि-३,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दि. २३ जुलै, २०२१.

वाचा:- १. प्रधान सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी यांचे अर्धशासकीय पत्र क्र. क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१७६/२१/३३, दिनांक ३०.०६.२०२१.

२. भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र.४९१/ईसीआय/एलईटी/स्वीप-१/ईएल/ईएलसी/२०१७, दिनांक ०३.११.२०१७.

**परिपत्रक**

भारत निवडणूक आयोगाच्या "मतदारांचे पद्धतशीर शिक्षण आणि निवडणूक सहभाग [Systematic Voter Education and Electoral Participation (SVEEP)]" या कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना निवडणूक प्रक्रियेबद्दल माहिती व्हावी, त्यांच्यामध्ये मतदार म्हणून नावनोंदणी करण्याविषयी, मतदान करण्याविषयी तसेच लोकशाहीविषयी जागरूकता आणावी, या उद्देशाने राज्यातील महाविद्यालयांमध्ये निवडणूक साक्षरता मंडळ (Electoral Literacy Club) स्थापन करण्याबाबत भारत निवडणूक आयोगाने सर्व राज्यांना निदेश दिलेले आहेत. त्यानुषंगाने प्रधान सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी त्यांच्या दि.३०.०६.२०२१ रोजीच्या पत्रान्वये राज्यातील सर्व विद्यापीठे/महाविद्यालयांमध्ये निवडणूक साक्षरता मंडळ (Electoral Literacy Club) स्थापन करण्याबाबत विनंती केलेली आहे.

त्यानुसार या परिपत्रकान्वये, राज्यातील अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे यांचे कुलगुरू यांना असे निर्देश देण्यात येत आहेत की, त्यांनी त्यांच्या विद्यापीठ परिसरामध्ये एक निवडणूक साक्षरता मंडळ (Electoral Literacy Club) स्थापन करावे, तसेच या विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये तसेच तंत्रनिकेतने व तत्सम शैक्षणिक संस्था यांना निवडणूक साक्षरता मंडळ (Electoral Literacy Club) तात्काळ स्थापन करण्याबाबतचे निदेश द्यावेत.

२. विद्यापीठ परिसरामध्ये, तसेच महाविद्यालयामध्ये निवडणूक साक्षरता मंडळ स्थापन करण्याची कार्यपद्धती, तसेच त्या अंतर्गत घ्यावयाच्या कार्यक्रमांची माहिती पुढीलप्रमाणे आहे :-

१) विद्यापीठाने आणि प्रत्येक महाविद्यालयाने विद्यार्थ्यांशी संपर्क साधून एक निवडणूक साक्षरता मंडळ स्थापन करावे.

Circulate to all concerns

२) निवडणूक साक्षरता मंडळासाठी नोडल अधिकारी व मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयातील एका शिक्षकाची नेमणूक करावी.

३) महाविदयालयातील विद्यार्थी हे निवडणूक साक्षरता मंडळाचे सभासद असतील. प्रत्येक वर्गातील निवडलेले प्रतिनिधी व विद्यार्थ्यांमधून निवडलेली समिती ही या मंडळाचे कामकाज पाहील.

४) निवडलेले विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक साक्षरता मंडळाच्या कायर्कारी समितीची स्थापना करतील. निवडलेले विद्यार्थी प्रतिनिधी हे मंडळाच्या अध्यक्ष व उपाध्यक्षांची निवड करतील.

५) महाविद्यालयामध्ये विद्यार्थी प्रमुखामार्फत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा निवडणूक साक्षरता मंडळामध्ये समावेश करून घेण्यात यावा. तसेच, महाविद्यालयामध्ये विद्यार्थी प्रमुख हा निवडणूक साक्षरता मंडळाचा संयोजक राहील व तो नोडल अधिकारी यांना त्याच्या कार्यामध्ये साहाय्य करील.

६) विद्यापीठ परिसरामध्ये परिक्षेत्र प्रतिनिधी (Campus Ambassador) हा निवडणूक साक्षरता मंडळाचे संयोजक म्हणून कार्य करेल. तसेच नोडल अधिकाऱ्यांना त्यांचे कामकाज पार पाडण्यासाठी साहाय्य करील.परिक्षेत्र प्रतिनिधीमार्फत विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा निवडणूक साक्षरता मंडळामध्ये समावेश करून घेण्यात यावा.

७) या वर्षी कोविड-१९च्या महामारीमुळे व्यक्तींच्या एकत्र येण्यावर आलेले प्रतिबंध विचारता घेऊन, प्रत्येक महाविद्यालयांमध्ये ऑनलाइन शिक्षणासाठी विद्यार्थ्यांचे व्हॉट्सॲपवर किंवा टेलिग्रामवर विषयनिहाय गट करण्यात आलेले आहेत. यामुळे या वर्षी विद्यार्थ्यांच्या व्हॉट्सॲपवर किंवा टेलिग्राम गटावर निवडणूक साक्षरता मंडळांची माहिती देऊन, तसेच आभासी माध्यमांवर व्याख्यान आयोजित करून विद्यार्थ्यांना निवडणूक साक्षरता मंडळांचे महत्त्व पटवून देण्यात यावे. त्यासाठी गूगल मीट, झूम किंवा तत्सम आभासी व्यासपीठांवर विद्यार्थ्यांसह बैठक आयोजित करून त्यांचे शंकानिरसन करण्यात यावे. तसेच, त्याआधारे महाविदयालयातील इच्छुक विद्यार्थ्यांचा निवडणूक साक्षरता मंडळामध्ये समावेश करण्यात यावा. अशाप्रकारे या वर्षी नोडल अधिकारी यांनी महाविद्यालयामध्ये निवडणूक साक्षरता मंडळ स्थापन करावे.

८) प्रत्येक महाविद्यालयाने दि. १५ ऑगस्ट २०२१ पर्यंत त्यांच्या महाविद्यालयात निवडणूक साक्षरता मंडळाची स्थापना करावी. तसेच दि. ३१ ऑगस्ट २०२१ पर्यंत निवडणूक साक्षरता मंडळाचा नोडल अधिकारी असणाऱ्या शिक्षकांचे आणि विद्यार्थी प्रमुखांचे संपर्क क्रमांक (भ्रमणध्वनी क्रमांक आणि मेल आयडी) मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाला आणि परिशिष्ट क्र. १ मध्ये देण्यात आलेल्या आपल्या जिल्हा कार्यालयाच्या मेल आयडीवर कळविण्यात यावेत.

९) नोडल अधिकारी यांनी निवडणूक साक्षरता मंडळामध्ये समाविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांचा निवडणूक साक्षरता मंडळासाठी व्हॉट्सॲपवर किंवा टेलिग्रामवर एक स्वतंत्र गट तयार करावा.

१०) मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय आयोजित करत असलेल्या विविध ऑनलाइन, ऑफलाइन स्पर्धांची माहिती नोडल अधिकाऱ्यांनी महाविद्यालयाच्या निवडणूक साक्षरता मंडळाच्या व्हॉट्सॲप किंवा टेलिग्रामच्या गटावर पाठवून विद्यार्थ्यांना सदर स्पर्धांमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहित करावे.

११) मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय आयोजित करत असलेल्या वेबसंवाद, परिसंवाद यांची माहिती महाविद्यालयाच्या निवडणूक साक्षरता मंडळाच्या गटावर पाठवून ते ऐकण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे.

१२) महाविद्यालयामधील १८ वर्षे पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनी मतदार नोंदणी केलेली आहे किंवा नाही, याच्या नोंदी कार्यालयाने घ्याव्यात आणि त्या अद्ययावत कराव्यात. त्यासाठी महाविद्यालयाला पुढील बाबी लक्षात घ्याव्या लागतील.

- नाव नोंदणी न केलेल्या विद्यार्थ्यांना नोंदणी करण्यास प्रवृत्त करावे.
- विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश देताना, निकालाचे प्रमाणपत्र देताना त्यांना मतदार नोंदणीविषयी विचारणा करून नोंदणी करण्यास प्रोत्साहन द्यावे.
- विद्यार्थी https://www.nvsp.nic.in संकेतस्थळावर जाऊन किंवा voter helpline App वरून ऑनलाइन नोंदणी करू शकतात किंवा ते वास्तव्यास असलेल्या मतदार नोंदणी कार्यालयात जाऊन नोंदणी करू शकतात.
- निवडणूक साक्षरता मंडळाचे नोडल अधिकारी-शिक्षकांनी नोंदणीसंदर्भात महाविद्यालयाच्या कार्यालयाशी समन्वय साधून महाविद्यालयांतील एकूण विद्यार्थी, मतदार नोंदणी केलेले विद्यार्थी आणि नोंदणी न केलेले विद्यार्थी यांचा आढावा घेऊन निवडणूक साक्षरता मंडळाच्या वार्षिक अहवालात त्या आकडेवारीचा समावेश करावा.

१३) महाविद्यालयाच्या निवडणूक साक्षरता मंडळांतर्गत आयोजित करण्यात आलेले उपक्रम; मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने आयोजित केलेल्या उपक्रमांमधील विद्यार्थ्यांचा सहभाग; महाविद्यालयातील एकूण विद्यार्थी, मतदार नोंदणी केलेले, नोंदणी न केलेले विद्यार्थी याविषयीचा सहामाही आणि वार्षिक अहवाल मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांना ceo_maharashtra@eci.gov.in या मेल आयडीवर तसेच आपल्या संबधित उप जिल्हा निवडणूक अधिकारी यांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-१ मधील ईमेल आयडीवर पाठविण्यात यावा. अहवालात निवडणूक साक्षरता मंडळाच्या नोडल अधिकाऱ्यांचा भ्रमणध्वनी नमूद करावा, जेणेकरून त्यांच्याशी पुढील समन्वय साधणे सुकर होईल.

१४) निवडणूक साक्षरता मंडळांसंदर्भात जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी व उप जिल्हा निवडणूक अधिकारी, हे संपर्क/समन्वय अधिकारी असतील. निवडणूक साक्षरता मंडळांतर्गत हाती घेण्यात येणाऱ्या उपक्रम/कार्यक्रम/विविध सपर्धा याबाबत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी व उप जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे वेळोवेळी मार्गदर्शन घ्यावे.

१५) सदर उपक्रमांसाठी राष्ट्रीय सेवा योजना प्रशासनाचे आवश्यक सहकार्य घेण्यात यावे.

३ सन २०२१-२२ मध्ये निवडणूक साक्षरता मंडळांतर्गत पुढीलपैकी उपक्रम घेण्यात यावेत :

१. ऑनलाइन स्पर्धा : निबंध, वक्तृत्व, व्यंगचित्र, विडंबन काव्य, गाणे, मीम, लघुपट निर्मिती, घोषवाक्य, चारोळी लेखन, कविता लेखन, प्रश्नमंजूषा इ.

२. लोकशाही विषयावर विविध वेबसंवाद, चर्चासत्रे, व्याख्याने इ.

३. विशेष दिनांचे आयोजन :

| | | |
|---|---|---|
| अ. | राष्ट्रीय युवा दिन:- | १२ जानेवारी |
| आ. | राष्ट्रीय मतदार दिन:- | २५ जानेवारी |
| इ. | जागतिक अपंग दिन:- | ०३ मार्च |
| ई. | जागतिक महिला दिन:- | ०८ मार्च |
| उ. | जागतिक तृतीय पंथीय ओळख दिन:- | ३१ मार्च |
| ऊ. | भारतीय संविधान दिन:- | २६ नोव्हेंबर |

यांपैकी काही दिन महाविद्यालयात दरवर्षी साजरे होतात. मात्र निवडणूक साक्षरता मंडळांतर्गत हे दिन साजरे करताना, त्यांचे महत्त्व लोकशाहीशी जोडून त्या दिनाच्या औचित्याला अनुसरून कार्यक्रम घेण्यात यावेत.

त्याचप्रमाणे मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाकडून आयोजित केल्या जाणाऱ्या पुढील उपक्रमांमध्ये महाविद्यालयीन निवडणूक साक्षरता मंडळानी सक्रिय सहभाग घ्यावा :-

१. विविध ऑनलाइन स्पर्धा

२. राज्य स्पर्धा महोत्सव

३. वेबसंवाद/परिसंवाद

४. विशेष दिन (राष्ट्रीय युवा दिन, राष्ट्रीय मतदार दिन, जागतिक अपंग दिन, जागतिक महिला दिन, जागतिक तृतीय पंथीय ओळख दिन)

राज्य स्तरावरील वरील उपक्रमांमध्ये भाग घेण्यास महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यात यावे. सदर उपक्रमांत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून कौतुक म्हणून त्यांच्या सहभागाबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल. त्याचप्रमाणे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय हे निवडणूक साक्षरता मंडळासाठी वेळोवेळी आयोजित करत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती आपणांस पुढील समाजमाध्यमांवर उपलब्ध होऊ शकेल:-

१. फेसबूक https://www.facebook.com/ChiefElectoralOfficerMaharashtra

२. ट्विटर https://twitter.com/CEO_Maharashtra

३. इन्स्टा https://www.instagram.com/ceo_maharashtra/

४. यू-ट्यूब https://www.youtube.com/channel/UCyhH४x५९W२SjX_२६५uYsljQ

५. निवडणूक आयोगाचे स्वीपचे संकेतस्थळ https://ecisveep.nic.in/gallery/?ct=१६२४५९५८३७

भारत निवडणूक आयोगाच्या "मतदारांचे पद्धतशीर शिक्षण आणि निवडणूक सहभाग [Systematic Voter Education and Electoral Participation (SVEEP)]" या कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयीन निवडणूक साक्षरता मंडळ स्थापनेचे ध्येय, उद्देश, वैशिष्टये आणि त्यांची कार्यपद्धती यांची सविस्तर माहिती या परिपत्रकासोबत परिशिष्ट-२ म्हणून जोडलेली आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२१०७२३१६३६५३६५०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

AJIT MADHUKARRAO BAWISKAR

(अ. म. बाविस्कर)
उप सचिव
उच्च व तंत्र शिक्षण विभाग

प्रत -

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव सचिव.
२. मा. प्रधान सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी मंत्रालय, मुंबई.
३. कुलगुरु, सर्व विद्यापीठे.
४. संचालक, उच्च शिक्षण, पुणे.
५. संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई.
६. संचालक, कला संचलनायलय, मुंबई.
७. कुलसचिव, सर्व विद्यापीठे.
८. उप जिल्हा निवडणूक अधिकारी, सर्व जिल्हे.
९. सर्व सह संचालक, उच्च शिक्षण.
१०. सर्व सह संचालक, तंत्र शिक्षण.
११. निवड नस्ती.

## परिशिष्ट -१

## राज्यातील सर्व उप जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे ईमेल आयडी

| अ. क्र. | जिल्हा | जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी ईमेल आयडी |
|---|---|---|
| १ | मुंबई | electionmumbaicity@gmail.com |
| २ | मुंबई उपनगर | dyelectionmsd@gmail.com |
| ३ | ठाणे | dydeothane@gmail.com |
| ४ | पालघर | dydeopalghar@gmail.com |
| ५ | रायगड | dydeoraigad@gmail.com |
| ६ | रत्नागिरी | dydeoratnagiri@gmail.com |
| ७ | सिंधुदुर्ग | dydeosindhudurg@gmail.com |
| ८ | पुणे | dydeopune१@gmail.com |
| ९ | सातारा | dydeosatara@gmail.com |
| १० | सांगली | dydeosangli@gmail.com |
| ११ | सोलापूर | dydeosolapur@gmail.com |
| १२ | कोल्हापूर | dydeokolhapur@gmail.com |
| १३ | अहमदनगर | dydeoahmednagar@gmail.com |
| १४ | धुळे | dydeodhule@gmail.com |
| १५ | जळगाव | dydeojalgaon@gmail.com |
| १६ | नंदुरबार | dydeonandurbar@gmail.com |
| १७ | नाशिक | dydeonashik@gmail.com |
| १८ | औरंगाबाद | dydeoaurangabad@gmail.com |
| १९ | बीड | dydeobeed@gmail.com |
| २० | हिंगोली | dydeohingoli@gmail.com |
| २१ | जालना | dydeojalna@gmail.com |
| २२ | लातूर | dydeolatur@gmail.com |
| २३ | नांदेड | dydeonanded@gmail.com |
| २४ | उस्मानाबाद | dydeoosmanabad@gmail.com |
| २५ | परभणी | dydeoparbhani@gmail.com |
| २६ | अमरावती | dydeoamravati@gmail.com |
| २७ | अकोला | dydeoakola@gmail.com |
| २८ | बुलढाणा | dydeobuldhana@gmail.com |

| | | |
|---|---|---|
| २९ | वाशिम | dydeowashim@gmail.com |
| ३० | यवतमाळ | dydeoyavatmal@gmail.com |
| ३१ | नागपूर | dydeonagpur@gmail.com |
| ३२ | वर्धा | dydeowardha१@gmail.com |
| ३३ | भंडारा | dydeobhandara@gmail.com |
| ३४ | चंद्रपूर | dydeo.chandrapur@maharashtra.gov.in |
| ३५ | गडचिरोली | dydeogad@gmail.com |
| ३६ | गोंदिया | dydeogondiya@gmail.com |

## परिशिष्ट -२

(परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र. १५३/विशि-३, दि. २३ जुलै, २०२१ सोबतचे परिशिष्ट)

भारत निवडणूक आयोगाच्या "मतदारांचे पद्धतशीर शिक्षण आणि निवडणूक सहभाग [Systematic Voter Education and Electoral Participation (SVEEP)]" या कार्यक्रमांतर्गत महाविदयालयीन निवडणूक साक्षरता मंडळ स्थापनेची रचना, ध्येय, उद्देश, वैशिष्टये आणि त्यांची कार्यद्धती यांची माहिती.

**अ. निवडणूक साक्षरता मंडळाची रचना :-**

i. शाळेतील विद्यार्थी हे मंडळाचे सभासद असतील व प्रत्येक वगार्तील निवडलेले विद्यार्थी प्रतिनिधी व विद्यार्थ्यांमधून निवडलेली समिती या मंडळाचे कामकाज पाहतील.

ii. निवडलेले विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक साक्षरता मंचाच्या कायर्कारी समितीची स्थापना करतील. निवडलेले विद्यार्थी प्रतिनिधी अध्यक्ष व उपाध्यक्षांची निवड करतील.

iii. परिक्षेत्र प्रतिनिधी निवडणूक साक्षरता मंचाचे संयोजक म्हणून कार्य करेल व नोडल अधिका-यांना त्यांचे कामकाज पार पाडण्यासाठी साहाय्य करतील.

**आ. कार्यकारी समितीचे कार्य व जबाबदाऱ्या :-** कायर्कारी समिती नोडल अधिकाऱ्यांचे मागर्दशर्न, अभिप्राय व पर्यवेक्षणाखाली निवडणूक साक्षरता मंडळाच्या कामकाजासाठी जबाबदार असेल.

i. मंडळाची नोंदणी करणे

ii. निवडणूक साक्षरता मंडळाच्या उपक्रमांची योजना करणे व त्या उपक्रमांसाठी वार्षिक दिनदिर्शका तयार करणे.

iii. निवडणूक साक्षरता मंडळासाठी संसाधने निर्माण करणे.

iv. मतदार म्हणून नोंदणी न झालेल्या विद्यार्थ्यांसाठी नावनोंदणीची सोय उपलब्ध करणे.

**इ. नोडल अधिकारी व मार्गदर्शक यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या :-** महाविद्यालयातून एक किंवा दोन शिक्षक निवडणूक साक्षरता मंडळाचे नोडल अधिकारी म्हणून काम पाहतील. ते संबंधित निवडणूक साक्षरता मंडळासाठी मागर्दशर्क म्हणून काम पाहतील. त्यांचे कामकाज खालीलप्रमाणे असेल:-

i. निवडणूक साक्षरता मंडळाची नोंदणी वाढिवणे व पर्यवेक्षण करणे.

ii. निवडणूक साक्षरता मंडळाच्या कायर्कारी समितीची निर्मिती व पर्यवेक्षण करणे.

iii. निवडणूक साक्षरता मंडळाच्या संसाधन निर्मितीसाठी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी विहित केलेल्या प्रक्रियेशी समन्वय साधणे.

iv. नवीन संसाधने निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे व ते जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना अग्रेषित करणे.

v. कार्यकारी परिषदेमार्फत वार्षिक दिनदर्शिकेत उपक्रमांसाठी मार्गदर्शन व पर्यवेक्षण करणे.

vi. मतदार म्हणून नोंदणी न झालेल्या विद्यार्थ्यांसाठी नावनोंदणीची सोय उपलब्ध करणे.

**ई. निवडणूक साक्षरता मंडळाचे ध्येय :-**

i. युवकांमध्ये मतदार नोंदणीसाठी, नवीन मतदारांच्या वाढीव निवडणूक सहभागासाठी, आणि लोकशाहीसाठी जागरूकता निर्माण करणे, ही निवडणूक साक्षरता मंडळाची जबाबदारी असेल. विद्यार्थ्यांच्या वयाची 18 पूर्ण झाल्यावर त्याची मतदार म्हणून नोंदणी करणे व त्याचा निवडणुकीत सहभाग वाढविणे, हे निवडणूक साक्षरता मंडळाचे ध्येय असेल.

ii. निवडणूक साक्षरता मंडळ हे तरुण व भावी मतदारांना निवडणूक प्रक्रियेची माहिती देईल व त्यांना निवडणुकीचे सक्रिय शिक्षण देईल. सक्षम लोकशाहीसाठी त्यांचा निवडणुकांमधील नैतिक सहभाग वाढविण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करील.

iii. विद्यार्थ्यांना मताची किंमत व महत्त्व समजण्यासाठी निवडणूक साक्षरता मंडळ प्रोत्साहित करेल आणि त्यांचे पहिले मतदान ते गमावणार नाहीत, याची खात्री करेल.

iv. निवडणूक साक्षरता मंडळ हे निवडणूक पार पाडण्यासाठी छोटे निवडणूक कार्यालय म्हणून काम करील. हे मंडळ निवडणुकीची यंत्रणा, निवडणूक प्रक्रिया, सक्षम लोकशाही इत्यादीविषयक कार्यक्रमांचे विद्यार्थ्यांसाठी आयोजन करील.

**उ. निवडणूक साक्षरता मंडळाचा उद्देश :-**

i. विद्यार्थ्यांना मतदार नोंदणी, तसेच संपूर्ण मतदार प्रक्रिया व त्या संदर्भातील बाबी - खेळ, स्पर्धा व नाटक इत्यादी योग्य व आकर्षक संसाधनांतून अनुभवासह शिकवणे.

ii. विद्यार्थ्यांना इलेक्ट्रीक मतदान यंत्र (EVM) व व्हीव्हीपॅट या निवडणुकीच्या यंत्राची मजबुती व सुरक्षितता यांबाबत माहिती देणे. निवडणूक प्रक्रियेची सचोटी व पारदर्शकता यांबाबत माहिती देणे.

iii. विद्यार्थ्यांना त्यांच्या मताचे मोल कळण्यासंदर्भात व त्यांना त्यांच्या मतदानाच्या अधिकाराचा आत्मविश्वासाने, नैतिकतेने वापर करण्याबाबत, माहिती देणे व मार्गदर्शन करणे.

iv. विद्यार्थ्यांना निवडणुकीतील तांत्रिक नावीन्यतेची, निवडणुकीबाबतच्या घटनात्मक, कायदेविषयक बाबींची, निवडणूक आयोगाच्या स्वरूप व कार्यपद्धती यांविषयी, निवडणुकांसंबधी न्यायालये व प्रसामाध्यमे यांची भूमिका, यांविषयी माहिती देणे.

v. १८ वर्ष पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मतदार नोंदणी सुविधा उपलब्ध करून देणे.

ऊ. **निवडणूक साक्षरता मंडळाची वैशिष्ट्ये :-**

i. निवडणूक साक्षरता मंडळाची महाविद्यालयात स्थापना झाल्याचे संबधित महाविद्यालयाने कळविताच, त्या निवडणूक साक्षरता मंडळाला मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाकडून एक कोड नंबर दिला जाईल.

ii. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य हे जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या मार्फत निवडणूक साक्षरता मंडळासाठी साहित्य, खेळ इत्यादींबाबत संसाधने व माहिती पुरवतील. भारत निवडणूक आयोगाच्या स्वीप (SVEEP) पोर्टलवर निवडणूक साक्षरता मंडळासाठी संसाधने निर्माण करून ठेवलेली आहेत.

iii. प्रत्येक निवडणूक साक्षरता मंडळाच्या नोडल अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण जिल्हा व तालुका स्तरावरील मास्टर ट्रेनर यांच्याद्वारे करण्यात येईल.

iv. महाविद्यालयातील निवडणूक साक्षरता मंडळ हे कोणत्याही राजकीय पक्षाशी संबधित असू नये. या मंडळाचे कामकाज तसे होणार नाही, याची जबाबदीरी संबंधित नोडल अधिकारी घेईल.

v. उत्तम काम करणाऱ्या निवडणूक साक्षरता मंडळाचा जिल्हास्तरावरून तसेच राज्यस्तरावरून सत्कार करून, त्यांना बक्षीस दिले जाईल.

ए. **निवडणूक साक्षरता मंडळासाठी सर्वसाधारण उपक्रम :-**

i. जागतिक मतदार दिवशी निवडणूक साक्षरता सप्ताहाचे आयोजन.

ii. निवडणूक आणि लोकशाही यांच्याशी संबधित वादविवाद स्पर्धा.

iii. भित्तिपत्रके, निवडणुकीविषयक वृत्तांतलेखन, निवडणूक आणि लोकशाहीविषयक हस्तलिखत.

iv. निबंध स्पर्धा, कथा लेखन स्पर्धा, व्यंगचित्र स्पर्धा

v. क्विझ, खेळ, कोडी, स्क्रॅबल, मार्गशोधक इत्यादी.

vi. समाजमाध्यमासंबंधी (सोशल मीडियासंबंधी) उपक्रम राबवणे.

vii. निवडणूक साक्षरता शिबिरे.

viii. मतदान व निवडणुका या प्रक्रियेविषयीची अभिरूप नाटुकले सादर करणे.

ix. निवडणूक अधिकाऱ्यांसह कार्यक्रम.

x. मतदार नोंदणी शिबिर किंवा मतदार नोंदणीसाठी अभिनव उपक्रम.

[संदर्भ- भारत निवडणूक आयोगाच्या पत्र क्र.४९१/ईसीआय/एलईटी/स्वीप-१/ईएल/ईएलसी /२०१७, दि. ०३.११.२०१७ सोबत प्राप्त निवडणूक साक्षरता मंच प्रकल्प पत्रिकेआधारे.]

*****